ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री मुक्ती विषयक विचार

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण,
समाजशास्त्र विभागप्रमुख
शारदा महाविद्यालय, परभणी.

स्त्री मुक्ती, स्त्री पुरुश समानता हे विषय भारतीय समाज व्यवस्थेच्या, संस्कृतीच्या सुरुवाती पासून ऐरणीवरचे विषय. महावीर, बुध्द, बसवन्ना, चक्रधर, चार्वाक्य, निस्सार अशा कितीतरी महामानवांनी या विषयावर मांडणी केली व प्रत्यक्ष काम केले. प्राचीन भौतिक संघर्षाचा सारा इतिहास जसा मानव मुक्तीचा इतिहास आहे तसाच तो स्त्री पुरुष या समतेच्या मांडणीचाही इतिहास आहे. म.फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक काळात उभी केलेली समता, शोषण मुक्ती आणि मानवतेची चळवळ ही व आधुनिक स्त्री मुक्तीची पायाभूत चळवळ आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे प्रमुख सूत्र म्हणजे त्यांनी सिध्द केलेल्या स्त्री–पुरुश समानतेवर आधारलेल्या नव्या समाजाच्या दिशेने स्वतंत्र भारताने टाकलेले महत्त्वाचे पाऊल होय. महीलांमध्ये राष्ट्रीय, सामाजिक, राजकीय, हक्क आणि कर्तव्ये तसेच नागरिकत्वाची जाणीव निर्माण करणे आणि त्यांना लोकशाही समाजवादी दृष्टिकोन देणे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथम कामद्यामध्ये आणि नंतर भारतीय राज्यघटनेमध्ये सरंक्षक अशा तरतुदी समाविष्ट करून घेण्याचे विचार मांडले. हिंदू कायद्याच्या संहितेसंबंधीचे विधेयक म्हणजे भारताच्या कायदेमंडळाच्या इतिहासातील समाज सुधारक घडवून आणण्याचा सर्वात मोठा प्रयत्न होता. या विधेयकामुळे भारताला घटने पेक्षाही शतपटीने अधिक लाभ होईल आणि समग्र महिला समाजाचे कल्याण होईल असे विचार बाबासाहेबांनी मांडले.

8 मार्च ह्या जागजिक महिला दिनाचे महत्त्व जगभरातील महिलांच्या दृष्टिने केवळ आत्मसन्मन, आत्मसामर्थ्य आणि मूलभूत हक्कच्या जाणिवांचे संकेत देणारे तसेच महिलांच्या सर्वव्यापी सांघिक शक्तीचे द्योतक आणि प्रेरणा स्त्रोत मानले गेले. भारतीय महिलांच्या बदलत्या परिस्थितीचा विचार केल्यास काही समाधाान कारक मूल्ये आणि व्यवस्थांचा प्रभाव निश्चितपणे जाणवतो. वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात स्त्रियांच्या क्षमतेला मिळालेला न्याय आणि संधी म्हणजे महिलाबद्लचा विश्वास. त्याचे महत्व समाजाने काही प्रमाणात का होईना मान्य केल्याची पावतीच आहे. तसेच नियोजन बध्द कार्यात महिलांचे सहकार्य घेणे विशिष्ट किंवा अवघड कामाचे प्रतिनिधित्व स्त्रियांकडे सोपवणे ही काळाची गरज ठरवल्यामुळे स्त्रियांना केवळ रोजगारांची संधी मिहाली असे नाही तर विविध क्षेत्रात कर्वृत्व गाजविण्याची ही संधी मिळाली. सामाजिक अधिकार मिळाले. संरक्षण देणारे कायदे मिळाले, विघातक रुढीवर बंधने आली, समान संधी मिळाल्यामुळे आर्थिक बळही मिळाले पण एकूण लोक संख्येच्या तुलनेत जवळपास अर्धी संख्या असणाऱ्या स्त्रियांची स्थिती लक्षात घेतल्यास फारच थोडयांना म्हणजे विशेषतः उच्च मध्यावर्गीय स्त्रियांनाच बदलत्या व्यवस्थेचा लाभ मिळाला. यावरुन हे स्पष्ट होते की, आजही स्त्री स्वातंत्र्य, समता, सहयोग, न्याय या बाबतचे असंख्य प्रश्न अनुत्तरीतच आहेत. या असंख्य प्रश्नांची उत्तरे आपणांस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या समतावादी वैचारिक आणि कृतिशील लढयाच्या विचार सरणीत आहेत हे स्पष्ट होते. बाबासाहेबांच्या कृतीची काही उदाहरणे बघितल्यास बाबासाहेबांनी 25 डिसेंबर 1925 रोजी महाड येथे आपल्या अनुयायासह मनूस्मृतीचे दहन केले. ज्यामध्ये स्त्रीला हीन लेखणारे स्वातंत्र्य नाकारणारे कायदे केले होते. मुळातच माणूस म्हणून स्त्रियांचे जीवन नाकारणाऱ्या मनूस्मृतीचे दहन करुन, स्त्री व शुद्रांना मुक्तीचे द्वार खुले केले. महाड येथील चवदाळ तळे सत्या ग्रहाच्या पहिल्या दिवशी सायंकाळी परिषदेतील महिलांची उपस्थिती पाहून स्त्रियांविषयी विश्वास व्यक्त करतांना ते म्हणतात की, अस्पृश्यता निवारण्याचे कार्य महिलांनी हाती घेतले तर ते काम त्या अधिक जोमाने व वेळेत करतील. त्यांच्यामध्ये मनोधैर्य, शिस्त व करारीपणा जास्त आहे. असे स्पष्ट करुन बाबासाहेब त्यांचा आत्मविश्वास वाढवितात.

### हिंदू कोड बिलांतर्गत :

1) भारतीय राज्यघटनेतील तरतुदी नुसार या देशातील सर्व जाती जमातीच्या स्त्रियांना समान संधी, समान हक्क अधिकार हवेत. 2) मुलींनाही वारसाहक्क असावा व त्या हक्काप्रमाणेच प्रत्येक मुलीला वडिलांच्या इस्टेटीतील समान हिस्सा मिळावा. 3) स्त्रियांना स्वतःच्या मिळकतीवर पूर्ण हक्क व अधिकार असावा. 4) पती'पत्नीचे काही कारणामुळे पटत नसल्यास व एकत्र संसार करणे जमत नसल्यास तिला पतीपासून घटस्फोट मिळावा. 5) घटस्फोट झालेल्या स्त्रीला पतीकडून पोटगी मिळावी. 6) पहिल्या पत्नीत कोणताही दोश नसतांना व ती जीवंत असतांना दुसरी पत्नी करण्यास कायद्याने बंदी असावी (द्विभाया प्रतिबंध कायदा) 7) एखाद्या स्त्रीला वारस नसल्यास

दुसऱ्या मुलास दत्तक घेण्यास रितसर परवानगी असावी. 8) स्त्रीस आंतरजातीय आंतर धर्मीय विवाहास कायद्याने संमती असावी. 9) सार्वजनिक ठिकाण व धार्मिक कार्यात स्त्रीला शूद्र अथवा कमी लेखू नये. 10) राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात स्त्रियांच्या लोसंख्येप्रमाणे त्यांना प्रतिनिधित्व मिळावे. त्यांना आरक्षण मिळावे असा स्त्रीच्या उत्थानाचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला.

याचा उद्देष स्त्री दर्जा उंचावणे व समाजात त्यांना योग्य स्थान प्राप्त करुन देणे हा होता. त्यामुळे ते स्त्री उन्नतीसाठी कार्य करणारे नवस्मृतिकार ठरले. ते म्हणतात, एखाद्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवर त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते त्यामुळे महिलांसाठी प्रगतीचे मार्ग मोकळे असायला हवे.

तसेच स्त्री समानतेवर गदा आणून त्यांना सतत मातृत्व बहाल करणाऱ्या पुरुषांना थोडी समज यावी आणि या देशाच्या प्रगतीस बाधा ठरणारी लोकसंख्या वाढू नये. स्त्रीचे दौर्बल्य नाहीसे होऊन समाजात तिला प्रतिष्ठा मिहावी. स्त्री आनंदी आणि उत्साही राहावी यासाठी देशाला कुटूंब नियोजनाची अत्यंत गरत आहे हे सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले एकमेव राजकीय पुरुश होते. संपूर्ण स्त्री वर्गाबद्दल त्यांच्या मनात अत्यंत आदराची भावना होती. स्त्री दक्षिण्याची त्यांना पुरेपूर जाण होती. समाजोन्नतीसाठी स्त्रिया फार मोलाची कामगिरी करु शकतात. आजच्या स्त्री मुक्तीची, स्वातंत्र्याची, निर्भिडपणाची, प्रगतीची बीजे फुल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांत दिसून येतात.

आजची स्त्री ही आंबेडकर प्रणित विचारांचा वारसा घेऊन स्वतःची वाटचाल करतांना दिसते. राजकारण, समाज कारण, औद्योगिक क्षेत्र, साहित्य, इत्यादी सर्वक्षेत्रे तिने आपल्या बुध्दीचातुर्याने, चिकाटीने काबीज केली आहेत. त्या स्वाभिमानी व आत्मनिर्भर बनल्या आहेत. स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचा नवा मंत्र प्राप्त करुन त्यांचा कायाकल्प करणाऱ्या असिमित दुर्दशेतून त्यांना मुक्त करणाऱ्या तलाक, विवाह, दत्तक, उत्तरा धिकारी, संपत्ती, पोटगी, स्वातंत्र्य इत्यादी विषयी स्वयंनिर्णय शक्ती बहाल करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीला लाभलेले योगदान अतिशय मौलिक आहे. आज स्त्रीयांनी गाजवलेली सभा, संमेलने आणि त्यानुसार घडत असलेले समाज परिर्वतन हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडून मिळालेला वारसा या देशातील महिला कदापिही विसरु शकणार नाहीत. वर्तमान समाज विघातक प्रवृत्ती विरुध्द परिवर्तनाची आग्रही भूमिका स्वीकारुन सामाजिक मूल्य व्यवस्थेत तळागाळातील स्त्रियांना सामावून घेणे त्यांचा जास्तीत जास्त सहभाग वाढविणे आणि त्यांच्या ठिकाणी न्याय्य हक्क समानतेबाबत जाणीव जागृती निर्माण करणे अशा स्थित्यंतराची सार्थकी वाटचाल या दृष्टीने समाज प्रबोधनासाठी प्रयत्न करणे हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कृती होती.

परंतु आज सद्यःस्थितीचा विचार केल्यास एक गोष्ट लक्षात येते. महापुरुशांनी बहाल केलेल्या हक्क अधिकारामुळे पारतंत्र्याच्या गर्तेत बुडालेली तळागाळातील स्त्री काही प्रमाणात स्वतंत्र झाली. मुक्तपणे श्वास घेऊ लागली. शिक्षण मिळाल्यामुळे ही स्त्री मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी काही अंशी तयार झाली. शिक्षणामुळे ती अर्थाजन करु लागली पण बहूजन समाजातील स्त्रियांवर अजूनही अत्याचार होतांना दिसतात. त्यांचे शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे व महत्वपूर्ण जगापासून त्या कोसो दूर आहे.

खरे तर समाजाचा अर्धा भाग हा स्त्रियांनी व्यापला आहे. (उच्चवर्णीय बहूजन वर्गातील स्त्रियांची गोळाबेरीज केल्यास) बहूजन समाजातील बहुतांश स्त्रिया या आजही दारिद्रय रेशेखाली जीवन जगत आहेत. ग्रामीण भागातील स्त्रिया डोंगर दऱ्यांमध्ये राहणाऱ्या आदिवासी स्त्रियांच्या अन्न, वस्त्र, निवारा या साध्या मूलभूत गरजाही पूर्ण होत नाहीत. कुपोशण आणि रोगराईच्या गर्तेत या स्त्रिया आहेत. शिक्षणाची संधी नसल्यामुळे बाकी सुख सुविधांचा विचारही शक्य नाही.

स्त्रीला शिलाचे बंधन असल्यामुळे काचेचे भांडे या स्वरुपामये तिचे रक्षण केले जाते, पालन पोषण केले जाते. बऱ्याच वेळा हे बंधन तिच्या प्रगतीच्या आड येतांना दिसते. विवाहानंतर तिचे मातृकुलीन सदस्यत्व संपुष्टात येते. जन्मदात्यासाठी वारसदार म्हणून तिचे अस्तित्व नाहीसे होते. पतीगृही कर्तव्य व निर्बधांचे ओझे तिला सतत वाहावे लागते. मुलगी ही जबाबदारी या भावनेतूनच आजकाल स्त्री भ्रृणहत्येचे प्रमाण वाढतांना दिसत आहे.

भारतामध्ये जवळपास प्रत्येक मिनिटाला महिलांवर अत्याचार होतात याची आकडेवारी उपलब्ध आहे. अनेक अत्याचाराची नोंदही होत नाही. शरीर विकण्यासाठी तरुण मुलींचा होणारा व्यापार यांचेही प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अशा अत्याचारास बळी पडलेल्या स्त्रियांचे कुटूंबामध्ये आणि समाजामध्ये पुनर्वसन होणे दुरापास्त ठरते. अषी स्त्री समाजाच्या दृष्टिकोनातून बहिष्कृत ठरते.

ज्या समाजव्यवस्थेने स्त्रीला गुलाम बनविले. रुढी परंपरांचे ओझे दिले. तिचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. माणूस म्हणून जगण्यासाठीच्या किमान मानवी मूल्यांपासून तिला वंचित ठेवले.

अशा स्त्रियांना स्वातंत्र्य मिळावे. ती हया बंधनातून मुक्त व्हावी यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले विचार व प्रत्यक्ष कृती अत्यंत महत्वाची ठरते. परंतु त्यांचे विचार सर्वसामान्य स्त्रीपर्यंत पोहचणे अत्यंत आवश्यक आहे. जोपर्यंत हे विचार सर्व समाजातील तळागाळातील स्त्री किंवा वंचित स्त्रीपर्यंत पोहोचणार नाही तोपर्यंत स्त्री मुक्त होणार नाही. एकंदर मानवमुक्ती ही आगामी काळाची गरज आहे. या समाजक्रांतीसाठी किंवा समाज मुक्तीसाठी प्रबोधन, संघटन आणि संघर्ष करुन बाबासाहेबांचे विचार व त्यानुसार कृती करण्याची गरज आहे.

***संदर्भ सूची :***

1) *डॉ. देशमुख अलका, विविधांगी आयामातून स्त्री, नागपूर, साईनाथ प्रकाषन.*
2) *भागवत विद्युत, स्त्री–प्रश्नांची वाटचाल, पुणे, प्रतिमा प्रकाशन 2004*
3) *मून मीनाक्षी, फुले आंबेडकरी स्त्री चळवळ.*
4) *डॉ. लांजेवार ज्योती, फुले आंबेडकर आणि स्त्री मुक्ती चळवळ.*